MHAH080023622022 **रेगुलर दरखास्त क्र.१४९/२०२२ मधील निशाणी क्रमांक १५ वर आदेश.**

(कारभारी गोपाळा पावबाके विरुध्द उत्तम मुरलीधर पावबाके व इतर)

**(दिनांक ०२/०७/२०२४ रोजी)**

सदर दरखास्तीने वादीने/धनकोने प्रतिवादी/रुणको विरुध्द प्रतिवादीने केलेल्या ओट्याचे व ग्रिलचे बांधकाम काढुन मिळण्यासाठी दाखल केली आहे. प्रतिवादींना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २१ नियम २२ ची नोटीस लागली आहे. परंतु प्रतिवादींनी ओटा व ग्रिल काढुन घेतले नाही. मे.तहसिलदार यांनी रस्ता मोकळा करुन वादीस दिलेला आहे. परंतु हुकूमनाम्याप्रमाणे प्रतिवादींनी ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन घेतले नाही. सबब, सदर ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन मिळण्यासाठी कमिशनची नेमणुक व्हावी यासाठी वादीने सदर अर्ज दाखल केला आहे. कमिशनची नेमणुक व्हावी यासाठी वादी कमिशन फी भरण्यासाठी ओटा व ग्रिल काढुन घेण्यासाठी लागणारे मजुर देण्यास वादी तयार आहे. सबब, वादीने अर्ज मंजुर होण्याची विनंती केली.

**०२.** प्रतिवादी/रुणको यांनी **नि.२१** वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, **नि.१५** वरील अर्ज खोटा व बेकायदेशिर असुन वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा असल्याने प्रतिवादीस मान्य नाही. वादी त्यांच्या वापरात असलेल्या रस्त्याचा विना अडथळा वापर करत आहेत. तसेच मे.तहसिलदार, संगमनेर यांनी रस्ता केस क्र.५४/२०२१ मधील आदेशाप्रमाणे वादातीत रस्त्यातील ओटा, ग्रिल व सरपन इत्यादी अडथळे दि.१६/०६/२०२२ रोजी दुर केलेले असुन त्याबाबत पंचनामा केलेला आहे. तेव्हापासुन वादी सदरचा रस्ता सलगपणे विना अडथळा वापर करत आहे. त्यामुळे प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादी सदरचा रस्ता विना अडथळा वापरत असल्याने कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्याची कोणतीही आवश्यकता किंवा तशी परिस्थिती निर्माण न झाल्याने वादीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदर दरखास्त रे.मु.क्र.१०१/२००६ मधील हुकूमनाम्याची अंमलबजावणीसाठी दाखल केलेला असुन सदर दाव्यातील हुकूमनामा मा. मुंबई

उच्च् न्यायालय, औरंगाबद खंडपिठ यांच्याकडील द्वीतीय अपिल क्र.३००/२०१८ मधील आदेशानुसार कामय करण्यात आले आहे. सदर हुकूमनाम्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन पश्चिमेकडील २० मिटर रस्ता वादीस खुला करुन देण्याचे आदेश देण्यात आले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मे.तहलिसदार, संगमनेर यांनी वादीस प्रतिवादीकडुन रस्ता खुला करुन दिला आहे. परंतु रे.मु.क्र.१०१/२००६ मधील हुकूमनाम्यानुसार ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन पश्चिमेकडील २० मिटर रस्ता प्रतिवादींनी वादीस खुला करुन दिलेला नाही. प्रतिवादी तर्फे दाखल रस्ता केस क्र.५४/२०२१ मधील आदेशाचे अवलोकन केले असता सदर आदेशानुसार सर्वे क्र.२१८/६ व सर्वे क्र.२१८/११ मध्ये जाण्या येण्यासाठी असलेल्या वहिवाटीच्या रस्त्यात केलेले अडथळे दुर करुन तेथुन प्रस्तुत वादी यांना त्यांच्या शेतीमध्ये जाण्या येण्यासाठी हरकत अडथळा करु नये असा मनाई हूकूम देवून रस्ता खुला करुन द्यावा असा आदेश झाला आहे.

**०४.** सदर आदेशानुसार प्रतिवादीतर्फे दाखल दिनांक १६/०६/२०२२ रोजीच्या पंचनाम्याची प्रत पाहिली असता त्यानुसार मंडल अधिकारी, संगमनेर यांनी दावा मिळकतीतील वहिवाटीच्या रस्त्यातील अडथळे ओटा, सरपण, मातीचा ढिगारा दुर करुन पश्चिम कोप-यात असलेल्या मंदिरापासुन साधारण २० फुट रुंदीचा रस्ता पुर्व-पश्चिम खुला करुन देण्यात आला असे दिसुन येते. त्यानुसार प्रतिवादी यांनी **नि.२३** सोबत पंचनाम्यापुर्वीचा व पंचनाम्यानंतरचा असे दोन छायाचित्र फोटोग्राफरच्या पावतीसह दाखल केले आहेत. सदर छायाचित्रांचे अवलोकन केले असता सदर रस्त्याच्या पश्चिमेकडील मंदिरापासुन असलेला मातीचा ढिगारा व सरपण असा अडथळा दुर करुन रस्ता खुला करुन दिल्याचे असे दिसुन येते. छायाचित्रांवरील पुर्वेकडील दिसणारा ओटा व त्यावरील ग्रिल आहे तसे दिसुन येते. रे.मु.क्र.१०१/२००६ मधील हुकूमनाम्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना संबंधीत ओटा व ग्रिल काढुन २० मिटरचा खुला रस्ता पश्चिम बाजुने देण्याबाबत विशिष्ठ निर्देष देण्यात आले आहेत. परंतु **नि.२३** सोबत दाखल असलेल्या पंचनाम्यामध्ये ओटा काढल्याबाबत नमुद असले तरी दाखल छायाचित्रांमध्ये ओटा व ग्रिल काढल्याचे दिसुन येते नाही. परंतु, प्रतिवादीतर्फे दाखल मंडलअधिकारी संगमनेर यांनी केलेला दि.१६/०६/२०२२ रोजीचा पंचनामा पाहता सदर पंचनाम्यामध्ये ओटा काढल्याचे नमुद आहे. त्यामुळे सध्या परिस्थितीला हुकूमनाम्याप्रमाणे २० मिटर रस्ता ओटा व ग्रिल यांचा अडथळा दुर करुन खुला करुन दिला आहे किंवा कसे याबाबत दिवाणी पक्रिया संहिता कलम ४७ प्रमाणे चौकशी करण्याठी स्थळ पाहणी करणे न्यायोचित होईल. सबब, सद्य परिस्थितीत

दावा मिळकतीतील अचुक स्थिती अभिलेखावर आल्याशिवाय थेट वादी/धनको यांच्या विनंतीप्रमाणे ओटा व ग्रिल काढण्यासाठी कमिशनची नेमणुक करणे न्यायोचित होणार नाही. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

(श्रीमती एस. बी. ढवळे)

सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, संगमनेर.

संगमनेर.

दिनांक ०२/०७/२०२४.

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखक | – श्री. डी. ए. टेमकर. |
| न्यायालय | – सह. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, संगमनेर. |
| न्यायनिर्णय संक्रमित दिनांक | – ०२/०७/२०२४ |

लघुलेखक